**ठळक बातम्या**

- शेतकऱ्यांना कृषीविषयक आधुनिक तंत्रज्ञान आणि बियाण्यांची माहिती देण्यासाठी येत्या २९ मे पासून देशव्यापी विकसित कृषी संकल्प अभियान सुरु होणार

- उच्च न्यायालयातल्या अतिरिक्त न्यायाधीशांनाही इतर न्यायाधीशांप्रमाणेच पूर्ण निवृत्तीवेतन आणि सेवानिवृत्तीचे इतर लाभ मिळाले पाहिजेत असा सर्वोच्च न्यायालयाचा निवाडा

- भारत-पाकिस्तान तणावाच्या पार्श्वभूमीवर आशियाई क्रिकेट परिषदेच्या दोन स्पर्धांमधून बाहेर पडण्याचा भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचा निर्णय

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत गुजरात टायटन्स आणि पंजाब किंग्ज हे संघ प्लेऑफमधे दाखल

**आणि**

- मुंबई-गोवा महामार्गावर आज झालेल्या अपघातात पाच जणांचा मृत्यू

**<><><><><>**

शेतकऱ्यांना कृषीविषयक आधुनिक तंत्रज्ञान आणि बियाण्यांची माहिती देण्यासाठी येत्या २९ मे पासून देशव्यापी विकसित कृषी संकल्प अभियान सुरु होणार आहे. केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान  यांनी आज नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. देशातल्या  ७२३ जिल्ह्यांमधे ही मोहीम राबवण्यात येणार असून सुमारे दीड कोटी शेतकऱ्यांपर्यंत ही माहिती पोहोचवण्याचं उद्दिष्ट आहे. सुमारे ६५ हजार गावात जाऊन वैज्ञानिकांचं पथक शेतकऱ्यांना यासंदर्भात प्रात्यक्षिकं आणि प्रशिक्षण देईल. जिल्हा पातळीवर या पथकाच्या दररोज तीन बैठका होतील, असं त्यांनी सांगितलं....

**होल्ड- बाईट- शिवराज सिंह चौहान**

शेती क्षेत्रामुळे सुमारे निम्म्या लोकसंख्येला रोजगार मिळतो, आणि अन्नसुरक्षेचा पाया घातला जातो. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारताच्या संकल्पनेत, 'विकसित कृषी- समृद्ध किसान' असं उद्दिष्ट आहे असं ते म्हणाले. २०२३-२०२४ या वर्षात एकूण अन्नधान्य उत्पादन ५५७ लाख टन झालं ते २०२४ -२५ या वर्षात एक हजार ६६४ लाख टनांपर्यंत गेल्याची माहिती त्यांनी दिली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारत २०४७ उद्दीष्ट पूर्ततेसाठी डिजिटल सार्वजनिक खरेदी व्यासपीठ - सरकारी ई-मार्केटप्लेस हे एक महत्त्वाचे इंजिन आहे, असं मत केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी एका इंग्रजी वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेखात नमूद केलं आहे. सरकारी ई मार्केटप्लेसमुळे भ्रष्टाचार निर्मूलन झालं आहे. तसंच लहान शहरांमधील विशेष करून वंचित आणि मागास घटकांना सक्षम केलं आहे. करदात्यांच्या पैशांची मोठ्या प्रमाणात बचत केल्याचंही गोयल यांनी या लेखात म्हटलं आहे.

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूरच्या गौरवार्थ देशभरात तिरंगा यात्रा काढण्यात येत आहेत.
भारतीय सेनेने 'ऑपरेशन सिंदूर'द्वारे दाखवलेला शौर्य, संयम आणि बलिदानाच्या सन्मानार्थ **रायगड जिल्ह्यात पनवेल इथं** तिरंगा यात्रा काढण्यात आली. या यात्रेत आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील सहभागी झाले होते.

**लातूर जिल्ह्यातही** ऑपरेशन सिंदूर'च्या यशाबद्दल भारतीय सैन्याच्या सन्मानार्थ आणि कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी तिरंगा यात्रा काढली होती. यात्रेत माजी सैनिकांसह मोठ्या संख्येनं नागरिक सहभागी झाले होते.

भारतानं दहशतवादाविरोधात राबवलेल्या ऑपरेशन सिंदूर बद्दल लातूर जिल्ह्यातल्या सर्वसामान्य नागरिकांनी दिलेल्या प्रतिक्रिया ऐकू या...

**होल्ड.... बाईट**

**<><><><><>**

उच्च न्यायालयातल्या अतिरिक्त न्यायाधीशांनाही इतर न्यायाधीशांप्रमाणेच पूर्ण निवृत्तीवेतन आणि सेवानिवृत्तीचे इतर लाभ मिळाले पाहीजेत असा निवाडा सर्वेच्च न्यायालयाने आज दिला. न्यायाधीशाच्या नेमणुकीची तारीख आणि त्यांच्या पदावरुन भेदभाव करणं संविधानाच्या १४व्या कलमाअंतर्गत समानतेच्या हक्काची पायमल्ली ठरेल, असं सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई आणि न्यायमूर्ती ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या पीठाने सांगितलं. उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून निवृत्त झालेल्या न्यायमूर्तींना वार्षिक १५ लाख रुपये निवृत्तीवेतन मिळेल, तसंच अतिरिक्त न्यायाधीश म्हणून सेवानिवृत्त झालेल्या दिवंगत न्यायमूर्तींच्या कुटुंबांनाही निवृत्तीवेतन आणि इतर लाभ मिळाले पाहिजेत, असं न्यायालयाने सांगितलं.

**<><><><><>**

कर्नल सोफिया कुरेशी यांच्याबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य करणारे भाजपचे मंत्री विजय शहा यांच्याविरोधातल्या एफआयआरची चौकशी करण्यासाठी भारतीय पोलीस सेवेतल्या तीन वरिष्ठ सदस्यांचं विशेष तपास पथक स्थापन करायचे आदेश सर्वोच्च न्यायालयानं आज दिले. उद्या सकाळी १० वाजेपर्यंत हे पथक स्थापन करावं, या पथकातले अधिकारी मध्य प्रदेशातले नसावेत, तसंच यापैकी एक अधिकारी महिला असावी, असे निर्देशही न्यायमूर्ती सूर्य कांत आणि न्यायमूर्ती एन. कोटीश्वर सिंह यांच्या पीठानं दिले. याप्रकरणी विजय शहा यांच्या अटकेला सर्वोच्च न्यायालयानं स्थगिती दिली. शहा यांनी केलेल्या वक्तव्याबद्दल संपूर्ण देश शरमिंदा आहे, अशी तोंडी टिप्पणी न्यायालयानं केली. या प्रकरणाची पुढची सुनावणी २८ मे रोजी होईल.

**<><><><><>**

भारत-पाकिस्तान तणावाच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तानच्या संघांचा सहभाग असलेल्या दोन महत्त्वाच्या स्पर्धांमधून बाहेर पडायचा निर्णय भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं घेतला आहे. श्रीलंकेत पुढच्या महिन्यात होणाऱ्या विमेन्स इमर्जिंग टीम्स एशिया कप आणि सप्टेंबर महिन्यात भारतात होणाऱ्या पुरुषांच्या आशिया चषक स्पर्धेत भारत आता खेळणार नाही. या दोन्ही स्पर्धांचं आयोजन करणाऱ्या आशियाई क्रिकेट परिषदेचं नेतृत्व सध्या पाकिस्तानचे अंतर्गत विषयांचे मंत्री मोहसीन नक्वी यांच्याकडे आहे.

**<><><><><>**

आयपीएल च्या काल झालेल्या सामन्यात गुजरात टायटन्स आणि पंजाब किंग्जच्या विजयामुळे दोन्ही संघांना प्लेऑफचं तिकीट मिळालं, तर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूनंही अंतिम चार संघांमध्ये स्थान मिळवलं आहे. शनिवारी बेंगळुरूमध्ये पावसामुळे सामना रद्द झाल्यानं गतविजेत्या कोलकाता नाईट रायडर्सचा संघ स्पर्धेतून बाद झाला. आता एका प्लेऑफ स्थानासाठी मुंबई इंडियन्स, दिल्ली कॅपिटल्स आणि लखनऊ सुपर जायंट्स यांच्यात चुरस आहे. उर्वरित दोन्ही सामने जिंकले तर, पंजाब किंग्ज टॉप-२ च्या शर्यतीत टिकून राहील.

**<><><><><>**

श्रीक्षेत्र परळी वैद्यनाथ ज्योर्तिलिंग तीर्थक्षेत्र विकास आराखड्यासाठी सर्वोतोपरी सहकार्य करणार असल्याचं उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांनी आज सांगितलं. या कामांसाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही मात्र कामं दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण झाली पाहिजेत, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले. उपमुख्यमंत्री पवार आज बीड जिल्हा दौऱ्यावर आहेत.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयानं शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी अकरावीच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचं

वेळापत्रक जाहीर केलं आहे. यामध्ये  विद्यार्थ्यांना ऑनलाईन फॉर्म भरण्याचा सराव करण्यासाठी नोंदणी आणि महाविद्यालयांचा पसंतीक्रम भरण्याची संधी मिळेल. २० मे रोजी मध्यरात्री १२ वाजेपर्यंत हे सराव अर्ज उपलब्ध असतील. प्रवेशासाठी अंतिम  अर्ज २१ मे ते २८ मे  या कालावधीत भरता येतील. विद्यार्थी कमीतकमी १ आणि जास्तीतजास्त १० महाविद्यालयांच्या नावाचा पसंतीक्रम देऊ शकतात. तात्पुरती गुणवत्ता यादी ३० मे रोजी प्रसिद्ध केली जाईल. काही आक्षेप असल्यास विद्यार्थी  १ जून पर्यंत तक्रार निवारण पोर्टलवर तक्रार दाखल करू शकतात. अंतिम गुणवत्ता यादी ३ जून रोजी प्रसिद्ध केली जाईल, अशी माहिती संचालनालयानं दिली  आहे.

**<><><><><>**

मुंबई-गोवा महामार्गावर आज झालेल्या अपघातात पाच जणांचा मृत्यू झाला. मुंबईहून देवरुखला जाणारी कार चालकाचं नियंत्रण सुटल्यामुळे रत्नागिरीजवळ जगबुडी नदीत कोसळली. या अपघातात चालक गंभीर जखमी झाला आहे. या प्रकरणाचा पुढचा तपास सुरू आहे.

**//<><><><><>//**